REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २१ ऑगस्ट १९४६ अंक ३४




डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुले सशक्त होतात

सांड प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. कृ. सांड ब्रदर्स, चेंबूर लिमिटेड, चेंबूर, मुं.







पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.

डॉ. गोवंडे यांचे ज्वरबिंदू

पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा




रोग जंतू नाशक व हवा शुद्धि कारक
आरुंधती निलगिरी व एरंडेल वापरा
लक्ष्मी एजन्सी मुंबई २४




दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा:
ब्रँच सेक्रेटरी.

## शेअर बाजार

( ले.:–श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम.,
किताब बिल्डिंग, पुणें २. )

पंडित जवाहरलाल नेहरूंना तात्पुरतें सरकार बनविण्यास आलेलें पाचारण ही एक अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक घटना असून तिचे रगामी आर्थिक परिणाम घडणार आहेत. पंडित नेहरू हे अव्वल दर्जाचे राजकारणी पुरुष आहेतच पण त्याबरोबर ते निष्ठावंत समाजवादी आहेत हें विसरून चालणार नाहीं. अनेक वर्षांच्या कष्टानंतर सत्ता काँग्रेसच्या हातांत येत आहे व तिचे धुरीण आज पंडितजी आहेत. सत्ता हातांत येतांच काँग्रेसच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यांत ठरल्याप्रमाणें आर्थिक फेरबदल घडवून आणल्याखेरीज काँग्रेस राहणार नाहीं. आर्थिक नियोजनाला जोराची चालना मिळेल व नियोजनाचें ध्येय जनतेचें हित हेंच राहून आजवर मूठभर लोकांच्या हातांत असलेली आर्थिक सत्ता काढून घेतली जाईल. मागील पांच सहा वर्षांच्या काळांत कांहीं भांडवलवाल्यांनीं या देशांतील महत्त्वाचे उद्योगधंदे हातांत राखून युद्धाच्या संधीनें अलोट पैसा मिळविला आहे व मध्यंतरीच्या काँग्रेसच्या वनवासाच्या काळांत ब्रिटिश व अमेरिकन भांडवलवाल्यांशीं चुंबाचुंबी करून पैशाच्या जोरावर व प्रचंड आर्थिक योजनेचे कागदी घोडे नाचवून जनतेच्या डोळ्यांत धूळ फेकून या देशांतील एकूण अर्थव्यवस्था आपल्या ताब्यांत आणण्याचा घाट घातला आहे. हा भांडवलवाल्यांचा बेत आतां कितपत सिद्धीस जातो हें पाहणें आहे. आर्चिबाल्ड रोलंडनें आमच्या या भांडवलवाल्यांस जातां जातां मागच्या अंदाजपत्रकांत जादा नफ्यावरील कर उठवून देशांत नंगानाच घालण्यास मोकळिक देऊन आपले खिसे भरून काढण्यास चांगली संधि दिली; त्या आनंदाच्या भरांत सटोडियांनी देशांतल्या एकुण एक बाजारांतून कशी दिवाळी चालविली आहे हें प्रत्यहीं वर चढणाऱ्या शेअरबाजारांतल्या भावावरून दिसून येईल. पण जादा नफ्यावरील कराची उठावणी ही भांडवलवाल्यांना युद्धकार्याबद्दल ब्रिटिशांकडून मिळालेली शेवटचीच देणगी आहे हें पक्कें ध्यानांत घेतलें पाहिजे. काँग्रेसच्या कार्याला देणग्या दिल्या त्यामुळें ती मिंधी झालेली आहे व आपणास यापुढेंही जनतेस पिळण्यास मोकळीक राहील अशी त्यांची कल्पना असेल तर तो भ्रम आहे हें लवकरच त्यांना कळून येईल. ब्रिटिशांच्या युद्धाकरतां येथल्या त्यांच्या एजंटांनीं भरपूर पैसा, माल आणि मनुष्यबळ मिळवून दिलें. आतां नव्या राष्ट्रीय सरकारास देशाच्या आर्थिक पुनरुज्जीवनाकरतां पैसा, माल, आणि मनुष्यबळ लागणार आहे आणि हा पैसा आमच्या भांडवलवाल्यांखेरीज दुसऱ्या कोणाकडूनही निघणार नाहीं. याचा अर्थ असा कीं यापुढें जरी उत्पादनाच्या साधनांवर त्यांची मालकी राहिली तरी सध्याचे अभूतपूर्व नफे विसरावे लागतील. नव्या नव्या करास तोंड द्यावें लागेल; मुकाट्यानें भाव उतरवावे लागतील. कामकऱ्यांना महागतेच्या मानानें व माणुसकीच्या मानानें राहतां येईल असें चढतें वेतन द्यावें लागेल व काळ्या बाजाराला टाळें लावावें लागेल. एकवट्याचे म्हणजे मोनॉपलीचे दिवस संपतील व दलालीवर श्रीमंत होणाऱ्यांना दुसरे मार्ग पहावे लागतील. देशांतले प्रमुख धंदे व दळणवळणाचीं साधनें राष्ट्राच्या मालकीचीं होतील. थोडक्यांत, टाटा डिफर्डचें १३० रुपये व्याज कायम राखण्याकरतां काँग्रेस सत्ताप्रविष्ट होत नसून गरीब जनतेला दोन वेळ जेवण व अंगभर कपडा मिळवून देण्याकरतां तिनें कंबर कसलेली आहे. मुंबईच्या क्रिकेटक्लब ऑफ इंडियाच्या आरामखान्यांत रमीचे पत्ते जुळवीत जुगार खेळणाऱ्या श्रीमंत ( निर ) उद्योगपतींना काँग्रेसनें सेक्रेटॅरिअटमधल्या पट्टेवाल्यांना रोज दोन तास श्रीगणेशा शिकविण्याची शिक्षा दिली नाहीं म्हणजे मिळवली! सध्या शेअरबाजारांत फुगत असलेला फुगा केव्हां एकदम फुटतो कीं सटोडिया मुकाट्यानें हळूहळू मागच्या दारानें पाऊल काढून निघून जातो हें पाहणें मनोरंजक होईल.

---

## विविध माहिती

**मोटार विक्रीवरील नियंत्रण उठणार**—१ ऑक्टोबरपासून मोटारगाड्यांच्या विक्रीवरील नियंत्रण दूर होईल, असें समजतें. त्यांच्या किंमतीवरील नियंत्रण मात्र कांहीं काळपर्यंत चालू राहील.

**विक्री–करासाठीं नोंदणी**–विक्रीकर कायद्यान्वयें करावयाच्या नोंदणीची मुदत वाढवावी अशा अनेक मागण्या आल्या असल्यामुळें, नोंदणीअर्ज ऑगस्टअखेरपर्यंत स्वीकारण्यांत यावेत असें मुंबई सरकारनें विक्रीकर खात्यास कळविलें आहे. मात्र आतां अधिक मुदतवाढ होणार नाहीं, असा स्पष्ट खुलासा करण्यांत आला आहे.

**देहांतशासन बंद होण्याचा संभव**—ब्रिटिश सरकारनें १ जानेवारी १९४९ पासून पांच वर्षांच्या प्रयोगकाळापर्यंत देहांतशासन बंद करण्याचें ठरविलें असावें, असें ब्रिटिश वृत्तनिवेदनांवरून समजतें.

**अधिक कोळसा तर अधिक अन्न**—अमेरिकनव्याप्त जर्मनीमध्यें श्रमजीवी व खाणीकामगार यांच्या रोजच्या आहाराचें प्रमाण नवीन ठरावान्वयें, ४,००० कॅलरीपर्यंत वाढविलें जाईल. कोळशाच्या उत्पादनांत येत्या दहा महिन्यांत शे. ५० वाढ व्हावी हा वरील योजनेचा मूळ हेतू आहे. प्रत्येक खाणीकामगारास ह्या महिन्यांत हा वाढता आहार मिळेल. हा वाढावा मिळविण्यास त्यानें आपलें उत्पादन प्रमाणशीर वाढत नेऊन अखेर कमाल मर्यादा गांठली पाहिजे. ही कमाल मर्यादा न गांठल्यास वाढविलेलें अन्न तोडण्यांत येईल.

---


ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी, ( सं. औंध )

### नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची विशेष साधारण ( एक्स्ट्रा ऑर्डिनरी ) सभा सोमवार ता. २३-९-४६ रोजीं दोन प्रहरीं ३–३० वाजतां ओगलेवाडी येथें कंपनीचे बिझिनेस ऑफिसमध्यें खालील कामांचा विचार करणेसाठीं भरणार आहे:—

( १ ) कंपनीचें सध्याचें अधिकृत भांडवल रु. १०,००,००० ( प्रत्येकीं रु. २५ च्या ४०,००० शेअर्स मध्यें विभागलेलें ) आहे तें ( प्रत्येकीं पांच रुपयांच्या पांच लक्ष शेअर्समध्यें विभागलेलें ) रु. २५,००,००० चें करणें.

( २ ) कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ असोसिएशनमध्यें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांनीं सुचविलेल्या फेरफारांचा विचार करणें.

वरील ठरावाबाबतचीं तपशीलवार माहितीचीं छापील पत्रकें सभेच्या नोटिशीसह व्यक्तिशः भागीदारांचेकडे रवाना होत आहेत. तरी सर्व भागीदारांनीं सभेस हजर रहावें अशी विनंति आहे.

ओगलेवाडी. ता. ११ ऑगस्ट १९४६. } बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून
एस. पी. ओगले आणि कंपनी
मॅनेजिंग एजंट्स्.

---

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी, (सं. औंध).

### नोटीस.

#### इंटेरिम डिव्हिडंड १९४६

ता. ११–८–४६ रोजीं ओगलेवाडी येथें भरलेल्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या सभेंत दर भागास रु. २ (दोन फक्त) प्रमाणें इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें ठरलें आहे. तरी सर्व भागीदारांना असें कळविण्यांत येतें कीं, ज्यांचीं नांवें ता. ३१–८–४६ रोजीं कंपनीचे रजिस्टरवर दाखल असतील अशा भागीदारांनाच वरील डिव्हिडंड दिलें जाईल.

डिव्हिडंडच्या रकमा पाठविण्याची सुरवात ता. १५ ऑक्टोबर १९४६ पासून अनुक्रमानें होईल. तरी ज्यांचे पत्ते बदलले असतील त्यांनीं ते कंपनीस जरूर कळवावेत.

कंपनीचीं ट्रान्स्फर बुकें रविवार ता. १ सप्टेंबर १९४६ ते मंगळवार ता. १० सप्टेंबर १९४६ अखेर बंद राहतील.

ओगलेवाडी. ता. ११-८-१९४६ } बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून,
अेस. पी. ओगले आणि कंपनी,
मॅनेजिंग एजंट्स्.

अर्थ

बुधवार, ता. २१ ऑगस्ट १९४६




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.

# विमा-व्यवसाय आणि चलन-वाढ

विमा-व्यवसाय आणि चलनवाढ यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे आहेत हें तपासून पहाण्यापूर्वी, बेसुमार चलनवाढ होण्यापूर्वी हिंदी अर्थ-व्यवस्थेची स्थिति काय होती हें पहाणें आवश्यक आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी, म्हणजे १९३९ सालच्या मध्यापर्यंत जगांतील सर्वच देश कमी अधिक प्रमाणांत मंदीच्या चक्रव्यूहांतून कशीबशी वाट काढीत होते. अमेरिकेसारख्या धनाढ्य देशासंबंधीं सुद्धां हेंच विधान खरें आहे. अर्थात् हिंदी अर्थव्यवस्थाही या कर्षेतून सुटलेली नव्हती हें उघडच आहे. तेजी आणि मंदी हे शब्दप्रयोग मुख्यतः शेअर बाजार व सरकारी कर्जरोखे यांच्या व्यवहाराशीं निगडित झालेले आहेत हें खरें; परंतु एकंदर आर्थिक परिस्थितीच्या अनुरोधानें त्या शब्दांना कांहीं विशिष्ट अर्थ प्राप्त झालेलाच आहे. हा अर्थ सामान्यपणें नागरिकांना प्रतीत होतो. तो कशा प्रकारानें ? सामान्य माणसाला म्हणजे ज्याचें उत्पन्न मर्यादित असतें, अथवा त्यांत कमी अधिक बदल मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता नसते त्याला मंदीच्या कालांत जीवनोपयोगी वस्तू स्वस्त मिळतात, हातउसनी उधारी मिळूं शकते. उलट कर्ज काढण्याची पाळी आलीच तर तारण मोठें द्यावें लागून व्याजाचा दरही तेजीच्या कालापेक्षा अधिक द्यावा लागतो. तेजीच्या काळांत बरोबर याच्या उलट स्थिति असते. यावरून एक मुद्दा स्पष्ट होतो कीं विनिमयाचें साधन म्हणून वापरल्या जाणाऱ्या चलनाची विपुलता अगर टंचाई यांच्यामुळें मालाच्या खरेदी-विक्रीवर व अप्रत्यक्षपणें उत्पादनावरही बरे वाईट परिणाम घडून येत असतात. सर्वसामान्यपणें तेजी-मंदीच्या स्वरूपाची वरील रूपरेखा बरोबर असली, तरी विशिष्ट देशांतर्गत राजकीय व इतर परिस्थितीमुळें त्या स्वरूपाच्या चेहऱ्या-मोहऱ्यांत फरक दृष्टीस पडतोच. यापुढें जाऊन असेंही म्हणतां येईल कीं तसा तो न पडेल, तरच अर्थशास्त्रीय सिद्धांत मानवी नियंत्रणाच्या बाहेरील असें यथार्थतेनें म्हणतां येईल, असो.

१९३९ सालच्या मंदींतून इतर देशांप्रमाणेंच मार्ग काढीत असलेल्या हिंदुस्थानांत युद्ध सुरू झाल्यामुळें एका नवीनच आर्थिक पर्वाला प्रारंभ झाला. युद्धासाठीं जें मनुष्यबळ व द्रव्यबळ लागतें, तें उभें करण्याचे परंपरागत अर्थशास्त्राचे दोन मार्ग आहेत. अर्थात हिंदुस्थानासंबंधीं बोलतांना सध्याच्या परिस्थितींत अर्थशास्त्राचे मार्ग या वाक्याऐवजीं सरकारचे मार्ग, असा बदल केला पाहिजे. ते मार्ग म्हणजे कर्ज काढणें आणि कर वाढविणें. युद्ध चालू झाल्याबरोबर हिंदुस्थान सरकारनें या दोन्हीही मार्गांचा यथास्थित अवलंब केला. पण आधुनिक युद्धाचें व्यापक व सर्वंकष स्वरूप लक्षांत घेतां या मार्गांनीं उभारलेला पैसा अपुरा पडणार हें स्पष्टच होतें. म्हणून या दोन मार्गांबरोबरच नोटा छापण्याचा तिसरा व सर्वांत सोपा उपायही अंमलांत आणला गेला. आणि तेजीच्या अर्थकारणाला खरा रंग अगर बेरंग याच कारणामुळें चढला. कारण अर्थशास्त्रीय व्यवहाराच्या मध्यवर्ती सूत्रालाच या नव्या उपायामुळें धक्का लागला. कोठल्याही देशांतील आर्थिक व्यवहारांत शिलक टाकलेला पैसा ( Savings ) आणि खर्च केला जाणारा पैसा ( Spendings ) यांच्या प्रमाणांत कांहीं एक समतोलपणा आपोआप उत्पन्न होत असतो. हा समतोलपणा समाजांतील सर्व वर्गांच्या हिताच्या दृष्टीनें योग्यच असतो असा—निदान नेहमींच योग्य असतो असा—मात्र अर्थ नाहीं. उलट व्यक्तिनिष्ठ समाजाच्या आर्थिक व्यवहारांतील हा समतोलपणा सारखा ढळत असतो; आणि त्यामुळें या आर्थिक व्यवहाराला अनिश्चिततेचे हेलकावेही बसत असतात. तथापि हेतुपुरःसर नियुक्त केलेली अर्थ-व्यवस्था जोपर्यंत स्थिरपद झालेली नाहीं, तोंपर्यंत वरील प्रकाराचा समतोलपणा टिकवून धरण्याचा प्रयत्न करणें येवढेंच मनुष्याच्या हातीं असतें. अशा प्रकारच्या समतोलपणाच्या परिस्थितींत प्रत्यक्ष धनोत्पादनची वाढ होण्याची तात्त्विक शक्यता असते; व ही तात्त्विक शक्यता कमी अधिक प्रमाणांत व्यवहारानही दिसून येते. मागणी आणि पुरवठा यांत सामान्यतः जो समतोलपणा दिसतो, तो शिल्लक टाकला जाणारा पैसा व खर्च केला जाणारा पैसा यांच्यांतील समतोलपणाचें व्यावहारिक प्रतिबिंब असतें.

युद्ध सुरू झाल्याबरोबर धान्यधुन्य, कपडालत्ता, वाहतुक, दारूगोळा, युद्धाचीं साधनें व माणसें यांची एकदम मोठी मागणी सरकारतर्फे उत्पन्न झाली; आणि ती पुरविण्यासाठीं प्रचंड प्रमाणावर हिंदुस्थानच्या व इतर दोस्त राष्ट्रांच्यासाठीं सरकारी खर्च होऊं लागला. अर्थात् या सरकारी खर्चामुळें व्यापारी, ठेकेदार, कारखानदार यांना कंत्राटें मिळूं लागलीं आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या कोणाही इसमाला कोठेंना कोठें तरी निश्चित पगाराची नोकरी मिळूं लागली. त्याचा परिणाम विम्याच्या क्षेत्रांत न दिसूं लागणें शक्यच नव्हतें. विमा व्यवसाय हा कांहीं मूलभूत उत्पादक धंदा नाहीं. एकंदर उद्योगधंद्यांची परिस्थिति समाधानकारक असली आणि त्यांतून वाढत्या प्रमाणांत कामगारांची जरूर असेल तरच या व्यवसायाला भरभराटीचे दिवस दिसणार व टिकणार. आयुर्विमा हा व्यवसाय अशा रीतीनें एका अर्थानें परभृत व अर्थोत्पादनाच्या परिघावर आहे. अमुक काळीं अमुक इतका पैसा निश्चितपणें हाताशीं येईल अशी खात्री असल्याशिवाय सामान्यपणें कोठलाही मनुष्य आयु-र्विमा उतरण्यास तयार होत नाहीं. ( एजंटांचा हट्टाग्रह व क्वचित् प्रसंगीं सत्याग्रह मात्र वगळला पाहिजे.) हिंदुस्थानांतील आयु-र्विमा व्यवसाय हा प्रधानतः नोकरपेशा वर्गावर अवलंबून असल्यानें नोकऱ्यांच्या संख्येंत वाढ झाल्याबरोबर, आयु-र्विमा कंपन्यांच नव्या धंद्याचे आकडे फुगूं लागावे हें क्रमप्राप्तच होतें. हिंदी आयु-र्विमा-कंपन्यांनीं युद्धकालांत जो नवा धंदा पदरांत पाडून घेतला, त्याचे आकडे सहज नजरेखालीं घातले तरी सुद्धां वरील विधानाची सत्यता कळून येण्यासारखी आहे. व्यापारी पेशाचे व शेतकी पेशाचे लोक मुळींच विमा उतरीत नाहींत असें नाहीं. परंतु त्यांच्या विमा पत्रकांचें एकंदर विमा-पत्रकांशीं प्रमाण अत्यल्प असतें हें एक, शिवाय या व्यवसायांतील लोक ज्या प्रकारचीं व ज्या मुदतीचीं विमापत्रकें घेतात त्यांना विम्याच्या शास्त्रीय अर्थानें विमापत्रकें म्हणतांही येणार नाहीं हें दुसरें. वेताचे हप्ते दीर्घकाल घेऊन अनपेक्षित प्रसंगाची तरतूद करणें हा आयु-र्विमा व्यवसायाचा मुख्य उद्देश असतो. १५ वर्षांच्या पुढील हयातींतील विमा-पत्रकें आणि हयाती-नंतरचीं विमापत्रकें यांची संख्या कोठल्याही कंपनीच्या पूर्ण झालेल्या कामांत अधिक असते याचें रहस्य वर सांगितलेलें तत्त्वच होय.

निश्चित व नियमितपणें उत्पन्न हातीं येणाऱ्या लोकांच्या संख्येवर आयुर्विमाव्यवसाय अवलंबून असल्यानें अशा प्रकारच्या लोकांची संख्या घटूं लागली तर आयुर्विमा व्यवसायावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाल्यासेरीज रहाणार नाहीं. देशी उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें झाली तर अर्थातच आयुर्विमा व्यवसायावर होणारे हे प्रतिकूल परिणाम कांहीं लांबणीवर पडतील. उद्योगधंद्यांची वाढ नवीन व जुन्या धंद्यांना मिळणाऱ्या संरक्षक जकातीवर अवलंबून; पण संरक्षक जका

त्यांच्या भिंती उभारण्याचें सामर्थ्य राजकीय पेंचप्रसंगाची सोडवणूक राष्ट्रहिताच्या दृष्टीने होण्यावर अवलंबून आहे. दरम्यान पक्षोपपक्षांतील बेबनावाचा फायदा घेऊन मध्यवर्ती सरकार कालहरणाचा डाव खेळत आहे. या कालहरणाचा फायदा परकीय भांडवलाला मिळणें अपरिहार्यच आहे. हिंदी जनतेला चरितार्थ-साधनें पुरविण्याच्या नांवाखालीं त्यावरील आयातीचीं नियंत्रणें हळूहळू उठविण्यांत येत आहेत. युद्धकाळां जनतेंत वाटला गेलेला मुबलक पैसा समाजांत खेळत आहे तोंपर्यंत जास्तींत जास्त माल विकून शक्य तितका नफा मिळविण्याची स्पर्धा हिंदी व परकीय भांडवलवाल्यांत चालू आहे. या स्पर्धेत संरक्षण न मिळाल्यास हिंदी उद्योगधंद्यांना टिकाव धरणें अशक्य होईल. राजकीय पेंचप्रसंग सोडविण्यास विलंब लागल्यामुळें मुबलक पैशाच्या धोरणाचा फायदा परकीय भांडवलवाले उठवितील आणि राजकीय पेचप्रसंग पुढेंमागें समाधानकारक रीतीनें सुटला तरी त्या सुमारास हिंदी उद्योगधंद्यांना चमत्कारिक परिस्थितीस तोंड द्यावें लागेल. युद्धप्रसंगानें निर्माण झालेल्या नोकऱ्या संपलेल्या असतील, बहुसंख्य जनतेची वस्तु विकत घेण्याची सांपत्तिक स्थिति खालावलेली असेल; अशा परिस्थितींत आयु-र्विमा व्यवसायाच्या नव्या धंद्याला ओहोटी लागून जुन्या धंद्यापैकीं बराच धंदा रद्द होण्याचा संभव आहे. हिंदुस्थान सरकारतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या अधिकृत विमा-पुस्तकांत रद्द झालेल्या विमापत्रकांची शेकडेवारी देण्यांत येते. परंतु पेड-अप् अगर रोख किंमत घेतल्या गेलेल्या विमापत्रकांची शेकडेवारी देण्यांत येत नाहीं. ती देण्याची प्रथा पाडली तर विमा-व्यवसायाच्या आरोग्याची नाडी अधिक चांगल्या रीतीनें कळूं शकेल. याशिवाय, मुबलक पैशाच्या धोरणामुळें विमाकंपन्यांच्या व्याजाच्या उत्पन्नांत घट होत आहे. त्यामुळें विम्याच्या दरांत वाढ करण्याची जरूरी विमा-व्यवसायांतील बडे दादा बोलून दाखवीत आहेत. विमा-कंपन्यांवर आकारण्यांत येणाऱ्या प्राप्तीवरील कराचाही प्रश्न जाचक झालेला आहे. परंतु व्याजाचे उतरते दर आणि जबर करआकारणी हे मूलभूत आर्थिक परिस्थितीचे आनुषंगिक परिणाम आहेत. त्यामुळें त्यांचा विचार करणें जरूर असलें तरी त्या विचाराला तात्विकदृष्ट्या फारशी किंमत नाहीं. आयुर्विमा व्यवसायांतील तज्ज्ञ लोक वरील दृष्टीने या प्रश्नाचा विचार करतील काय ?

# स्फुट विचार

## कापडाच्या किंमतींची पुनः छाननी.

टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाच्या कमिटीनें गेल्या जुलैमध्यें कापड आणि सूत ह्यांच्या किंमतींची त्रैमासिक छाननी करून त्यांत दुरुस्ती सुचविली. तिला सरकारनें मान्यताहि दिली व १ ऑगस्टपासून ती अंमलांत येणार असें जाहीर केलें. किंमतींत वाढ मंजूर झाली, ती कमी नंबराच्या म्हणजे गरीबांस लागणाऱ्या जाड्या भरड्या कापडाच्या किंमतींत. ४० नंबरावरील सुताचें कापड मात्र स्वस्त करण्याचें ठरलें. ह्या किंमतींविरुद्ध बऱ्याच तक्रारी करण्यांत आल्या. सरकारनें पूर्वी मान्य केलेल्या दुरुस्त किंमतींची अंमलबजावणी करण्यास आतां सरकार उत्सुक नाहीं, असें समजतें. भरमसाट चलनवाढीचे दुष्परिणाम टाळण्याचें व जनतेला योग्य किंमतींस जिनसा उपलब्ध करून देण्याचें सरकारचें धोरण आहे. त्यास अनुसरून त्यानें तलम कापडाची किंमत वाढवून त्यांतून मिळणाऱ्या पैशाचा जाड्याभरड्या कापडाची किंमत कमी राखण्याकडे विनियोग करावा असें सुचविलें आहे. कमिटीने सरकारच्या उद्देशास मान्यता दर्शविली आहे, परंतु आपलें निश्चित मत देण्यास सप्टेंबरच्या मध्यापर्यंत मुदत मागून घेतली आहे. त्याचा अर्थ, कापड आणि सूत ह्यांच्या कमाल चालू किंमती तोंपर्यंत अंमलांत रहाणार आहेत.

## इंग्रज इंजिनिअर्सची आयात अजूनहि चालूच ?

"इंजिनिअर" ह्या ब्रिटिश पत्रांत सिंध सरकारच्या वतीनें हाय कमिशनरनें एक जाहिरात देऊन तीन असिस्टंट एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर्सच्या जागांसाठी अर्ज मागविले आहेत. अर्जदार हे युरोपियन ब्रिटिश नागरिक असले पाहिजेत, जागा कायमच्या व पेन्शनास लायक अशा आहेत, आरंभींचा पगार महिना ३०० रुपये अधिक समुद्र ओलांडून आल्याबद्दल भत्ता, विवाहित असल्यास आणखी भत्ता, येणाऱ्या प्रवासखर्चाची भरपाई, नोकरींत कायम केल्यास रजेसाठीं आणखी प्रवासभत्ता, ह्याप्रमाणें नोकरांस सवलती मिळावयाच्या आहेत. अजूनहि, हिंदुस्थानांतील लोकनियुक्त प्रांतिक सरकार विदेशी लोकांच्या कायम व महत्त्वाच्या जागीं नेमणूक करूं पहात आहे, ही आश्चर्याची गोष्ट आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स ( इंडिया ) या संस्थेनें वरील जाहिरातीकडे जनतेचें लक्ष वेधलें आहे. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सचें रौप्य अधिवेशन कलकत्ता येथें भरलें होतें, त्यावेळीं श्री. एस. बी. जोशी ह्यांच्या "विशिष्ट ज्ञान असणारा हिंदी तज्ज्ञ उपलब्ध नसेल, तरच परदेशी इंजिनिअरची नेमणूक करण्यांत यावी; अशा इंजिनिअरच्या नेमणुकीचा करार लहान मुदतीचाच असावा" ह्या अर्थाचा ठराव बिनविरोध पास झाला होता. त्याकडे लक्ष वेधणें आवश्यक आहे. इन्स्टिट्यूटच्या बालेकिल्ल्यांत राष्ट्रीय वृत्तीच्या विचारसरणीस अशा रीतीनें चालना देण्यांत आली होती. इन्स्टिट्यूटच्या ठरावाशीं विसंगत असें सिंध सरकारचें धोरण दिसतें. तज्ज्ञ इंजिनिअरांची हिंदुस्थानांत उणीव नाहीं, असें १९३५ च्या सुधारणा पूर्वीच्या जॉइंट पार्लमेंटरी कमिटीनें मत व्यक्त केल्यावरूनच इंग्लंडमधून होणारी इंजिनिअर्सची आयात थांबविण्यांत आली होती. सिंध सरकारनें अवलंबिलेलें धोरण प्रतिगामी स्वरूपाचें आहे व तें त्यानें टाकून द्यावें अशी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्सची सूचना आहे.

## बहिऱ्या मोटार ड्रायव्हर्सची कुचंबणा

हिंदुस्थानांत मोटार अपघातामुळें रस्त्यावरील लोकांच्या जीवाला जो धोका असतो त्याची जोखीम घेणारा विमा नुकताच सक्तीचा करण्यांत आलेला आहे. तिऱ्हाइत ( Third Party ) नागरिकांच्या दृष्टीनें ही सक्ती उचित अशीच झालेली असून मोटार चालविणाराच्या दृष्टीनें ही सक्ती गैर आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण, अपघाताची जोखीम घेणाऱ्या विम्याची पद्धत नसली तरी ज्याला अपघात होतो, त्या नागरिकाला कांहीं ना कांहीं नुकसानभरपाई द्यावी लागतेच. तिऱ्हाइत नागरिक दगावला तरी त्याच्या वारसाला गप्प बसविण्याचा प्रसंग कांहीं टळत नाहीं. पण समजा, मोटार चालविणारा हाक्या बहिरा असला तर विमा कंपनी ही जोखीम घेईल कीं नाही ? दक्षिण आफ्रिकेंतील कांहीं विमा कंपन्यांनीं बहिऱ्या मोटार-हाक्यांचे विमा घेण्याचें नाकारून त्यांना मोठ्या पंचायतींत टाकलें होतें. १९४२ मध्यें मंजूर झालेल्या व आतां अंमलांत आलेल्या कायद्याप्रमाणें या जोखमीचा विमा उतरणें तर त्यांना भागच होतें. या प्रश्नावर दक्षिण आफ्रिकेच्या पार्लमेंटांत वादविवाद झाला. त्यावेळीं कांहीं सभासदांनीं असें सुचविलें कीं, वरील कायद्याप्रमाणें गव्हर्नर जनरलला एक कॉर्पोरेशन स्थापन करून अर्ज नाकारल्या गेलेल्या मोटारहाक्यांचे अपघाताचे विमे स्वीकारतां येतील. मग अशा कॉर्पोरेशनची व विमा कंपन्यांची स्पर्धा झाली तर त्याला उपाय नाहीं. दक्षिण आफ्रिकेंत बहिरे मोटारहाके सुमारें ५-६ शें आहेत. बहिरा मोटारहाक्या इतर ड्रायव्हरांपेक्षां कमी कार्यक्षम असतो किंवा काय हाच यासंबंधांत मुख्य प्रश्न आहे. मोटार चालविणाऱ्या माणसाला नीट ऐकूं येत नसेल तर त्याच्यापासून रस्त्यावरील माणसांना अधिक धोका आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण दक्षिण आफ्रिका, अमेरिका व इतर कांहीं देशांतील अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, बहिरा ड्रायव्हर हा कोणत्याहि तऱ्हेनें कमी कार्यक्षम नसतो. दक्षिण-आफ्रिकेंत बहिरेपणामुळें मोटार हाकण्याचा परवाना नाकारला जात नाहीं. अशा ड्रायव्हरमुळें अपघात होण्याची शक्यता अधिक आहे असें मानलें तरी त्यावर उपाय सहज सुचण्यासारखा आहे. बहिऱ्या ड्रायव्हरावर वेगाचीं बंधनें अधिक घालावीं व तो गाडी चालवीत असेल त्यावेळीं गाडीच्या बाहेर दिसणारी एखादी प्रमुख खूण ठेवावी. परंतु बहिरेपणामुळें अपघाताच्या विम्याची जोखीम कंपन्यांनीं टाळतां कामा नये.

## दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स लिमिटेड, टी. नरसीपूर

### ४ ऑगस्ट १९४६ रोजीं भरलेल्या जनरल बॉडीच्या आठव्या सभेच्या वेळीं अध्यक्ष, राजसेवाप्रसक्त एन. रामराव बी. ए. बी. एल. यांनीं केलेलें भाषण.

सभ्य स्त्रीपुरुषहो,

कंपनीच्या ह्या आठव्या वार्षिक सभेचे प्रसंगीं डायरेक्टर बोर्डातर्फे आपलें स्वागत करतांना मला फार आनंद होत आहे.

आपण मागील समयीं एकत्र जमलों तेव्हां युद्धाचे काळे ढग डोक्यावर तरंगतच होते पण आतां ईश्वरकृपेनें आकाश निरभ्र झालें आहे. नाझीवाद आणि फॅसिझम् यांचा पूर्ण नायनाट झाला आहे, परंतु दुष्काळ व रोगराई हे युद्धदेवतेचे अनुयाई अजून पृथ्वीवर संचार करीत आहेत. युद्ध संपलें, परंतु शांतता अद्याप दूर आहे.

युद्धपरिस्थितीनें मिळालेल्या उत्तेजनामुळें फिलेचर्स धंद्याचा व्याप पूर्वीहून जवळजवळ चौपटीनें वाढला. आपणाला उत्पादन खर्चापेक्षां फारच थोडी अधिक किंमत घेऊन रेशीम पुरवावें लागलें असलें तरी सरकारनें दिलेल्या सवलतींमुळें, अग्रमानामुळें आणि आपल्या सर्व उत्पादनाच्या विक्रीच्या निश्चितीमुळें आपणांस संरक्षण मिळालें आणि धंदा निर्भयतेनें वाढला. आतां युद्धकालानें दिलेला आधार एकत्रित करून टिकवणें हें आपलें काम आहे. हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या फिलेचर रेशमाचा पांचवा हिस्सा आपली कंपनी तयार करते या माझ्या बोलण्यावरून पुढील व्याप केवढा मोठा आहे हें आपणांस सहज कळून येईल. युद्धामुळें धंदास मिळालेलें संरक्षण संपलें आहे, आणि आपणास उघड्या मैदानावर सामना देऊन बाजू संभाळावयाची आहे. देशांतील चरखा आणि बाहेरून आयात होणारें रेशीम या दोहोंची आपणांशीं होणारी चढाओढ आपण ध्यानांत घेतली पाहिजे. आपल्या मालाचा दर्जा हेंच चरख्याविरुद्ध संरक्षण. बाहेरून होणाऱ्या आयातीच्या चढाईविरुद्ध मात्र संस्थानानें चांगलें परिणामकारक जकातीचें धोरण स्वीकारून आपणांस पाठिंबा दिला पाहिजे. फिलेचर्सचा धंदा स्वयंपूर्ण होण्याकरतां सुद्धां संस्थानचें सहाय्य मिळणें जरूर आहे, ज्यामुळें युद्धकालीन वाढीस फार मदत झाली ते सामग्रीसंपादनाचे संबंधीं अग्रमान, युद्धोत्तर दृढतेकरतां चालू ठेवावयास हवेत. इतर देशांकडून महत्त्वाचें साहित्य मिळविण्याबाबत संस्थाननें आपल्या इभ्रतीचा व व्यवस्थेचा फायदा धंदास द्यावा. आपल्या उत्पादनाचा दर्जा सुधारावा म्हणून अनुक्रम लावण्याचीं आंतरराष्ट्रीय ग्रेडिंगवर आधारलेलीं प्रमाण मापनें उपयोगांत आणावीं व हें काम सरकारी गृहांतून व्हावें. आपआपसांतील मतभेद टाळण्याकरतां व खरेदी, उत्पादन आणि विक्री यासंबंधीं एकसूत्री धोरण राखण्याकरतां आपण संघटित होण्याकरितां झटलें पाहिजे.

### कसोटीचें वर्ष

आपण ज्या वर्षाची पाहणी करीत आहोंत तें वर्ष आपणांस कसोटीचेंच गेलें. आपला युद्धकालीन करार ऑगस्ट १९४५ अखेर संपला. तो करार चालू असतां रेशमाच्या कोषांवर नियंत्रण असल्यामुळें आपणांस सर्वसाधारण भरपूर पुरवठा होई; आणि रेशीम विकून येणाऱ्या किंमतीचें, रेशमाच्या कोषाला द्यावयाच्या किंमतीशीं कांहीं प्रमाण होतें. परंतु युद्ध संपतांच हें नियंत्रण काढून टाकण्यांत आलें व त्याचवेळीं रेशमाची कमाल किंमत मनास येईल तो आंकडा देऊन ठरवून टाकली गेली. रेशिमकोषाच्या व्यापारांत गोंधळ माजला आणि अवास्तव चढाओढ आणि, काळा बाजार यामुळें किंमती इतक्या भरमसाट चढल्या कीं फिलेचर्सचा धंदाच बंद होतो कीं काय अशी धास्ती बसली. आपले अध्यक्ष आणि राजसभाभूषण दि. ब. श्री. के. आर. श्रीनिवास अय्यंगार यांनीं या मुद्द्यावर सरकारशीं चर्चा केली व महत्प्रयत्नांनीं सरकारकडून थोड्या सवलती मिळविल्या. त्या अपुऱ्या असल्या तरी तेवढ्यामुळें धंदा तग धरूं शकला. म्हैसूर संस्थानांत नव्या नियमान्वें एका ठराविक कमाल किंमतीऐवजीं उत्पादनखर्च +७½ टक्के नफा अशी नवीन पद्धत बसविली आहे. परंतु तो यशस्वी झालेली नाहीं. कारण ही पद्धति ब्रिटिश हद्दींत किंवा इतर संस्थानांत मान्य केलेली नाहीं, आणि प्रत्येक प्रांतांतील नियम व पद्धति हीं भिन्न आहेत. नियंत्रणाचें धोरण हें विचारांत जरी सार्वत्रिक असलें, तरी प्रत्यक्ष कृतींत तो एक स्थानिक सावळागोंधळ आहे. आणि ह्या सावळागोंधळ सहन केला जातो याचें कारण कायद्याला केवळ कायदा समजूनच मान देणारांच्या माथींच तो मारलेला आहे. माझें स्वतःचें मत तर असें आहे कीं, पुढील दोन अटी पाळल्या गेल्या तरच तें खरें नियंत्रण. एक तर कोषापासून तयार रेशमापर्यंतच्या प्रत्येक अवस्थेचा त्या नियंत्रणांत समावेश असावा व दुसरें असें कीं ही योजना अखिल भारतीय असावी. रेशिम ही चैनीची वस्तु असून त्यावरील नियंत्रण कारखानदार व गिऱ्हाईक या दोघांनाही त्रासदायक असल्यामुळें त्यावर होणारा खर्च—सार्वजनिक पैशाचा खर्च—योग्य व जरूर आहे असें म्हणतां येणार नाहीं. नियंत्रण लवकरच दूर होईल अशी आपण आशा करूंया.

### उत्कृष्ट प्रगति

कंपनीला एवढ्या अडचणी आल्या तरी देखील या वर्षांत कंपनी चांगली प्रगति दाखवूं शकली.

१९४५ च्या ताळेबंदावरून व नफातोटापत्रकावरून तुम्हांस असें समजून येईल कीं जेथें १९४४ सालीं रु.५,४६,९८१-९-९ नफा झाला होता तेथें आतां रु. ५,७६,५४१-१५-० नफा झाला आहे. १९४५ सालच्या खर्चाचे रु. १,५५,०५६-१०-६ वजा करून ७०,२४८ रुपये घसारा म्हणून काढले असतां, आपलें उत्पन्न रु. ३,५१,२३७-५-४ होतें. या रकमेंतून एक्सेस प्रॉफिट टॅक्स ( यांत परत मिळावयाचें सर्कारचें ई. पी. टी. डिपॉझिट धरलें आहे ), सुपरटॅक्स व इनकमटॅक्सची तरतूद करण्याकरतां २,२०,०००, रु. बाजूला काढावे लागतात व आपणाजवळ निव्वळ नफा रु. १,३१, २३७-५-४ राहतो. या रकमेंत गेल्या वर्षीच्या हिशेबांतील रु. ६,६८७-१-११ मिळविले असतां एकंदर रक्कम रु. १,३७,९२४-७-३ होते. यांपैकीं ६¼ टक्क्याप्रमाणें ५०,००० रु. करमाफ इन्टेरिम डिव्हिडंड भागीदारांना पूर्वीच जाहीर करून भागीदारांस देण्यांत आलें. तेव्हां आतां उरलेले रु. ८७,९२४-७-३ पुढीलप्रमाणें वांटावयाचे ठरविलें आहे:—

| | |
|---|---|
| ( अ ) शेअर्सच्या दर्शनी किंमतीवर ६¼ टक्के करमाफ डिव्हिडंड अखेरचा म्हणून जाहीर करण्याकरतां ( आधीं जाहीर केलेला ६¼ टक्के इन्टेरिम डिव्हिडंड यांत मिळविला असतां, १९४५ करतां एकंदर करमाफ डिव्हिडंड १२½ टक्के होतो. ) | रु. ५०,०००-०-० |
| ( ब ) डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडाकरतां | २५,०००-०-० |
| ( क ) पुढच्या वर्षाकरतां | १२,९२४-७-३ |
| एकूण रु. | ८७,९२४-७-३ |

आतां आपली एकंदर गंगाजळी पुढीलप्रमाणें होते:—

| | |
|---|---|
| सर्व साधारण रिझर्व्ह | रु. ३,००,०००-०-० |
| डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड | ५०,०००-०-० |
| एकून रु. | ३,५०,०००-०-० |

नफ्यापैकीं फार मोठा भाग उचलणाऱ्या एक्सेस प्रॉफिट टॅक्सची धंद्याच्या मानगुटीची पकड, तिच्या दोन वर्षांच्या अनावश्यक व नुकसानकारक अस्तित्वानंतर दूर झाली आहे, हें ऐकून भागीदारांना आनंद होईल.

### नव्या योजना

गेल्या सभेच्या वेळच्या माझ्या भाषणांत युद्धोत्तर कालांतील आमच्या योजना मीं सांगितल्या. आपल्या डायरेक्टरांनीं त्या योजना हातीं घेतल्या आहेत, हें सांगतांना मला आनंद होत आहे.

नंजनगुंडजवळ १५ एकर जागा आम्हीं मिळविली आहे. त्या ठिकाणीं फिलेचरचा व रेशीम विणण्याचा कारखाना उभारण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. आम्हीं हिंदुस्थानांतील प्रमुख रेशीम-केन्द्रांशीं व्यापारी

संबंध जोडले आहेत. आमच्या रेशमास आतां फार मागणी आहे ' चामुंडी चॉप ' निशाणी असलेलें आमचें रेशीम डोळे मिटून खात्रीचें म्हणून घेतलें जातें. रेशमाचा दर्जा वाढविण्याकरतां व वाढत्या मागणीला तोंड देतां यावें म्हणून आम्ही ' री-रीलिंगची ' क्रिया सुरू केली आहे. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया सारख्या रेशमाच्या प्रमुख ग्राहक देशांबरोबर कायम स्वरूपाचे व्यापारी संबंध जोडण्याच्या आम्ही खटपटींत आहोंत, व तस कांहीं संबंध आम्हीं प्रस्थापित केले आहेत.

आमच्यासमोर जरी कांहीं काल बिकट दिसत आहे तरीपण भविष्यकाल उज्वल आहे, व आम्ही विश्वासानें व आशेनें पुढें नजर ठेवूं शकतों. भूतकालांतील आमच्या परिश्रमांचा परिणाम पाहिला असतां ही आशा योग्यच आहे. कंपनीची मजबुती प्रत्येक वर्षाला वाढत गेल्यामुळें ती आतां भक्कम पायावर उभी आहे. ह्या सर्व कालांत कंपनीचा अध्यक्ष असल्याबद्दल मला अभिमान वाटतो. माझें भाषण संपविण्यापूर्वी, इतकीं वर्षे कंपनीचा कारभार सुव्यवस्थितपणें व दक्षतेनें चालविल्याबद्दल नाइक आणि कंपनी या मॅनेजिंग एजन्सीचे श्री. जी. कृष्णस्वामी यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

आमचे मदतनीस व सर्व दर्जाचे कामगार आम्हांस निष्ठेनें चिकटून राहून कंपनीचें काम दक्षतेनें व भूषणावह होईल असें करीत राहिले याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. तसेंच सहानुभूतिपूर्वक सहाय्य केल्याबद्दल म्हैसूर सरकारचे मी आभार मानतों.

सभ्य स्त्रीपुरुषहो, मी आधींच तुमचा पुष्कळ वेळ घेतला आहे. आपल्या पुढील कामकाजास आपण आतां लागूंया.

---

**हिंदुस्थानच्या दारिद्र्याचे अमेरिकेंत पडसाद**—हिंदुस्थानांतील अन्नपरिस्थिति पाहण्याकरितां अमेरिकेहून आलेल्या खाजगी मंडळाचे एक प्रतिनिधि, जोसेफ विलेन ह्यांनी "न्यूयॉर्क पोस्ट"ला दिलेल्या मुलाखतींत पुढें लिहिल्याप्रमाणें उद्गार काढले:—" हिंदुस्थानांतील अन्नवाटपपद्धतींत जर कांहीं बिघाड झाला तर तेथें उपासमारीमुळें हाहाःकार उडेल, तो चुकवावयाचा असेल तर डिसेंबर अखेरपर्यंत २० लक्ष टन धान्य हिंदुस्थानला मिळावयास हवें. याकरितां धान्य भरलेलीं जहाजें ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांत हिंदी बंदरांत पोंचलीं पाहिजेत. हिंदी लोक रोजीं १२ पासून १६ औंस अन्नावर जीवन कंठीत आहेत. त्यांच्या दारिद्र्याची कल्पना करण्यास यथार्थ शब्द सुचत नाहींत. 'जिवंत' या शब्दाचा अर्थच बदलावा लागेल. कारण योग्य अर्थानें जर हा शब्द वापरला तर हिंदी लोक जिवंत नाहींत असें म्हणावें लागेल."

**सोन्याचांदीवरील जकातींत काट**—सुवर्णाच्या आयातीवरील जकात दर तोळ्यामागें २५ रु. ऐवजीं १२½ रु. व चांदीवरील दर औंसामागें ८ आण्यांऐवजीं ४ आणे तावडतोब करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. जकात कमी करण्याचा उद्देश आयातीस उत्तेजन देण्याचा आहे.

**लंडनमध्यें कमाल घटस्फोट**-लंडन घटस्फोट न्यायालयानें २,३१६ प्रारंभावस्थेंत असलेले घटस्फोटाचे हुकूमनामे एका दिवसांत पूर्ण करून दिले. १५ जानेवारी, १९४६ रोजीं पुरा केलेला यापूर्वीचा कमाल आंकडा १,१२४ होता. पूर्ण हुकूमनामा मिळविण्याकरतां लागणारा वेळ सहा महिन्यांऐवजीं सहा आठवड्यांचा केला हें या वाढाव्याचें कारण आहे.

---


बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

## नोटीस.


ह्या बँकेचे सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं, बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार दि. ८ सप्टेंबर १९४६ इ. चे दिवशीं दुपारीं ३ वाजतां बार्शी येथें बँकेच्या साने मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरतां भरणार आहे, तरी त्या वेळीं सर्व सभासदांनीं हजर रहावें अशी विनंति आहे.

बार्शी,
ता. ३१-७-४६.

बोर्डाचे हुकुमावरून,
र. प. पटवर्धन,
मॅनेजर.



पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८



महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून

**पैसा व ज्ञान मिळवा !**

**श्रीमंत कसें व्हावें**—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा ! किं. १॥ रु.

**१०० टक्के यश**—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील ! किं. १॥ रु.

**काम आणि कामिनी**—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें। अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.

**मृत्युलोकचा प्रवास**—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल ! किं. १ रु.—चारीं पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ !

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.



**बिनचूकच्या माहितीनें**

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——






मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## बँकांच्या रोसीच्या आकड्यांची सजावट

आपले ताळेबंद उठून दिसावेत ह्यासाठीं सर्वच कंपन्या प्रयत्न करतात. आपल्या जवळील रोख शिलकेचें प्रमाण वाढवून दाखवून आपली स्थिति कोणत्याहि परिस्थितीस तोंड देण्यास कशी समर्थ आहे, हें पटविण्यासाठीं बँकांचीहि खटपट असते. ब्रिटिश बँकांची व्यवहारपद्धति अगदीं पुराणप्रिय व मक्रमपणास पोषक असल्याविषयीं त्यांची ख्याति आहे, परंतु त्याहि आपला दर्शनी भाग सजविण्याची कोशीस करतात आणि अशी सजावट करणें ही नित्यक्रमाची बाब होऊन बसली आहे, ह्यासंबंधांतील खालील आकडे उद्बोधक आहेत:—

| वार्षिक सरासरी | रोख रकम (दशलक्ष पौंड) सजावटीच्या दिवशीं | सजावट किती केली दर बुधवारीं (दशलक्ष पौंड) | रोसींचें प्रमाण (प्रसिद्ध केलेलें)% | रोसींचें प्रमाण (खरें) % | सजावटीचें* प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|
| १९३८ | २४१ | २१८ | २३ | १०·५ | ९·६ | ९·५ |
| १९३९ | २४४ | २२६ | १८ | १०·९ | १०·० | ८·३ |
| १९४० | २६८ | २४३ | २५ | १०·७ | ९·७ | ९·४ |
| १९४१ | ३११ | २५८ | ५३ | १०·५ | ८·७ | १७·१ |
| १९४२ | ३४५ | २७७ | ६८ | १०·५ | ८·५ | १९·१ |
| १९४३ | ३८६ | ३०० | ८८ | १०·५ | ८·२ | २१·९ |
| १९४४ | ४३७ | ३२९ | १०८ | १०·५ | ७·९ | २४·७ |
| १९४५ | ४९२ | ३५६ | १३६ | १०·५ | ७·६ | २७·६ |

रोसींचें प्रमाण वाढवीत जाण्याची ही प्रवृत्ति सालोसाल वाढत गेलेली वरील आंकड्यांत आढळून येईल. बँकांनीं आपल्याजवळ दाखविलेल्या रोख रकमेपैकीं सुमारें एक तृतीयांश रकम तात्पुरती आणलेली, किंवा परत मागविलेली होती, हें स्पष्ट आहे. सजावटीचें हें प्रमाण १९४६ च्या पहिल्या चार महिन्यांतहि कायम राहिलेलें आहे. एप्रिलमध्यें रोसींचें खरें प्रमाण ७·४% असतांना तें १०·५% असलेलें प्रसिद्ध होणाऱ्या आकड्यांत आढळतें. ब्रिटिश बँकांची सांपत्तिक स्थिति अत्यंत समाधानकारक असूनहि ही सजावट त्या करतात आणि त्या सजावटीचें प्रमाणहि दरमहा प्रसिद्ध होतें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. हिंदी बँकांचे ह्या प्रकारचे संकलित आकडे उपलब्ध झाल्यास ते उद्बोधक होतील.

* खरें व प्रसिद्ध केलेलें रोसींचें प्रमाण ह्यांतील फरक.

---

## हिंदी चहाची लागवड, उत्पादन व निर्गत

( ३१–१२–४४ रोजींचे आकडे )

| हिंदुस्थान | एकर |
|---|---|
| उत्तर आसाम व बंगाल | ६,५६,४६४ |
| पंजाब, सं· प्रांत व बिहार | २०,९५३ |
| दक्षिण हिंदुस्थान | १,६३,२७७ |
| एकूण | ८,४०,६९४ |
| सिलोन | ५,४९,६२५ |
| ने. ई. इंडीज ( १९३९ ) | ५,२९,८९४ |
| आफ्रिका | ४६,६५० |
| जपान ( १९३८ ) | ९८,३५५ |
| फोर्मोसा ( १९३८ ) | १,०९,८७० |
| राशिया ( १९४० ) | १,३९,६०० |

हिंदुस्थान व सिलोन हे चहाचें उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत, त्यांनीं १९४५ सालीं अनुक्रमें ५३३½ कोटि व २७३½ कोटि पौंड चहाचें उत्पादन केलें. त्या देशांनीं अनुक्रमें ३८९½ कोटि व २३ कोटि पौंड चहाची निर्गत केली.

हिंदी चहाच्या निर्गतीपैकीं निम्मी निर्गत ग्रेट ब्रिटनकडे झाली, कॅनडानें ४ कोटि पौंड व अमेरिकेनें ५ कोटि पौंड चहा घेतला.

## बँकेची निवड कशी करावी ?

ठेवीदारांच्या हितापेक्षा स्वतःचें हित आपल्याकडे किल्येक बँकांचा प्रवृत्ति असते तिला आळा घालण्यासाठीं सरकारला कायद्याची योजना करावी लागत आहे. तथापि ठेवीदारांनीच स्वतः योग्य बँकेची निवड करणें केव्हांहि श्रेयस्कर आहे. ह्या दृष्टीनें युनायटेड कमर्शिअल बँकेनें चांगल्या बँकेची १० गमकें सांगणारें एक चारपानी चोपडें प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील महत्त्वाचे प्रश्न खाली दिले आहेत.

( १ ) तुमच्या बँकेवर सत्ता कोणाची आहे व तिची व्यवस्था कोण पहातो ? बँकेचे डायरेक्टर व व्यवस्थापक ह्यांवर बँकेची मजबुती अवलंबून आहे. ते केवळ विश्वसनीय असून भागणार नाहीं तर ते बँक चालविण्यास लायक व अनुभवीहि असले पाहिजेत.

( २ ) तुमच्या बँकेचें भांडवल किती आहे ? ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें बँकेचें वसूल व वसूल न केलेलें भांडवल मोठें असणें इष्ट आहे. भांडवलाचें एकूण ठेवींशीं पडणारें प्रमाण पहा, म्हणजे सुरक्षिततेच्या प्रमाणाची कल्पना येईल.

( ३ ) बँकेच्या कारभारावर दक्षतापूर्वक नजर आहे काय ? कंपनी कायद्यानें हिशेब तपासणीची सक्ती केलेली आहे, परंतु हिशेबांच्या अंतर्गत तपासणीची बँकेनें योग्य व्यवस्था केली आहे काय ह्यांची चौकशी करा. कारभार ढिला असेल आणि चुका किंवा बनावटगिरी ह्यांस प्रतिबंधक योजना नसतील तर चांगले हेतू व मोठें भांडवल ह्यांचा नीट उपयोग होणार नाहीं.

( ४ ) बँकेचे पैसे पेरून गुंतविले आहेत काय ? बँकेचे पैसे सुरक्षित ठिकाणीं पसरून गुंतविले असावेत. त्यांची हिशेबी किंमत बाजारभावापेक्षां कमी दाखविलेली असावी. ठेवीदारांची अचानक मागणी आल्यास ती पार पाडतां येईल ह्या दृष्टीनें गुंतवणूक तरती असावी.

( ५ ) तुमच्या बँकेवर जनतेचा विश्वास किती आहे ? कांहीं बँका स्थानिक किंवा जमातींच्या आपुलकीवर वाढल्या तरी पहिल्या प्रतीच्या बँकेवर सर्व जनतेचा विश्वास असतो.

( ६ ) तुमची बँक व्याज किती देते ? गुंतवणूक किंवा कर्जें ह्यांची सुरक्षितता राखावयाची तर बँका भारी व्याज मिळवूं शकत नाहींत.

( ७ ) तुमच्या बँकेचें काम तत्परतेनें आणि गिऱ्हाइकांशीं अदबीनें वागून चालतें किंवा नाहीं ?

( ८ ) तुमच्या बँकेची वृत्ति राष्ट्रीय आहे ना ? विदेशी बँकांकडे तुम्ही गेल्यानें हिंदुस्थानावरील आर्थिक पकड कायम रहाण्यास सहाय होत रहातें.

---

**ब्रिटिश पोस्ट ऑफिसांत जादूचा दिवा**—ब्रिटिश पोस्ट-ऑफिसांतून पत्रावरील तिकिटावर पोस्टाचा शिक्का मारण्याचें एक काम जादूच्या दिव्याच्या साह्यानें सुलभ करण्यांत येणार आहे. पोस्टांत आलेल्या थैल्या सोडल्या म्हणजे त्यांतील पत्रें एका सरकत्या पट्ट्यावर टाकण्यांत येऊन त्यावर फ्रँकिंग माशीनमधून शिक्के पडत असत. पण शिक्याची बाजू नेमकी मशीनमध्यें जाण्यासाठीं हातानें पत्रें सारावीं लागत. परंतु या अद्भुत दिव्याच्या साह्यानें तिकिटांवरील रंगाचा फायदा घेऊन पत्रें योग्य रीतीनें मशिनमध्यें जातील अशी व्यवस्था आपोआप होणार आहे. या यंत्रसिद्ध पद्धतीमुळें कितीतरी श्रम वांचतील.

**आगीच्या विम्याचें नवीन क्षेत्र**—वेस्ट ऑस्ट्रेलिआमधील रेल्वेच्या आसपासच्या भागांत एंजिनमधील ठिणग्या उडून आगी लागतात. त्याबद्दल संस्थानच्या पार्लमेंटमध्यें तक्रार करण्यांत आली असतां विमा उतरणें एवढाच एक उपाय यासंबंधीं उपयुक्त ठरेल असें उत्तर रेल्वे मंत्र्यांनीं दिलें. विम्याचा फंड रेल्वेनजीक असलेल्या जमिनी व रेल्वे-खात्याची मदत यांतून उभारण्यांत यावा असें त्यांचें मत आहे.

**अमेरिकेंतील आगीचे विमे**—अमेरिकेंतील आगीचे विमा उतरणाऱ्या कंपन्यांच्या मध्यवर्ती संस्थेनें आगीमुळें झालेल्या नुकसानभरपाईचे आंकडे जाहीर केले आहेत. गेल्या एप्रिल महिन्यांत ५ कोटि ३१ लाख ५३ हजार डॉलर्स इतकी नुकसानभरपाई द्यावी लागली. गेल्या वर्षाच्या एप्रिलपेक्षां हा आकडा ३७ टक्के अधिक आहे. मार्चमधील नुकसानभरपाईची रक्कम ५ कोटि ३२ लाख ५२ हजार डॉलर्स होती.

—: साठे बिस्किटें :—

श्रुसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

खादी मन्दिर

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे) —एकमेव विक्रेते—

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्यांचे व्यापारी

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया

## ३॥ टक्याच्या बिनफेडीच्या कर्जांत बदल

मुदतः—१५ ऑगस्ट १९४६ पासून १६ सप्टेंबर १९४६ पर्यंत

(दोनही दिवस धरून)

(१) ३॥ टक्याचे १८४२–४३ चे कर्जरोखे
(२) ३॥ टक्याचे १८५४–५५ चे कर्जरोखे
(३) ३॥ टक्याचे १८६५ चे कर्जरोखे
(४) ३॥ टक्याचे १८७९ चे कर्जरोखे
आणि (५) ३॥ टक्याचे १९००–०१ चे कर्जरोखे

(गव्हर्नमेंट नोटीस नं. डी. / ४७६६–बी/४६, २४ मे १९४६ प्रमाणें परतफेडीसाठीं जाहीर झालेले).

धारण करणारांना (१) १९४६ चे ३ टक्याचे (दर्शनी) १०० रु. किंमतीबद्दली १०० रु.-किंमतीचे कर्जरोखे किंवा (२) (दर्शनी) १०० रु. किंमतीच्या कर्जरोख्याबद्दली ९९ रु. किंमतीचे कर्जरोखे घेतां येतील.

३ टक्यांचे १९४६ चे बदली कर्जरोख्यांची १६ सप्टेंबर १९८६ पर्यंत परतफेड होऊं शकणार नाहीं. आणि हे कर्जरोखे धारण करणाराला ४० वर्षेपर्यंत ३ टक्के व्याज मिळण्याची हमी दिली जाईल.

रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली आणि मद्रास येथील शाखेमध्यें आणि इतरत्र इंपीरियल बँकेच्या शाखेंत व सर्व ठिकाणीं सरकारी तिजोरीमध्यें अर्ज घेतले जातील.

सविस्तर माहितीसाठीं यापैकीं कोणत्याही कचेरीस, शाखेस किंवा तिजोरीस लिहा.

(हिंदुस्थान सरकारच्या फायनान्स खात्याचें प्रकाशन).

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.